21/08/2024, 22:07 1667974493735813490205985160071 - Sunanda Julme.jpg

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 314 (CCCXIV )
ISSN : 2278-9308
September, 2021

# अनुराधा पाटील यांची स्त्रीवादी जाणिवांची कविता

डॉ सुनंदा बोरकर जुलमे,
१५२, नाईक नगर,
पो. पार्वती नगर, मानेवाडा रिंग रोड, नागपूर.
मो. ८७६६४२२४७५ sunandaj205@gmail.com

गोषवारा :

मराठी साहित्यप्रांतातील अगदी प्राचीन तरी नित्यनुतन असे काव्याचे समृद्ध दालन रसिक, वाचक, अभ्यासक, समीक्षकांना नेहमी खुणावत असते. साठनंतरच्या दशकात काव्याचे नवनवे उन्मेश आणि नवनवे प्रवाह आपल्या अनंत सामर्थ्यासह काव्यविश्वात प्रकट झाले. लघुनियतकालिकातील कविता, महानगरीय संवेदना प्रकट करणारी कविता, मार्क्सवादी जाणिवेची कविता, दलित, आदिवासी, ग्रामीण, जनवादी स्त्रीवादी असे विविध काव्य प्रवाह या काळात निर्माण झाले. या सर्व प्रवाहाने विविध संवेदना नव्या अन्वयार्थासह व्यक्त केल्या आहेत. १९७५ नंतरच्या कालखंडात स्त्रीवादी कविता मोठ्या प्रमाणावर लिहिली जात आहे. मराठी कवितेच्या या अंतःप्रवाहाने वाङ्मयीन अभिरुचीचे, साहित्य-संस्कृतीचे आणि सशक्त रूपाचे क्षितिज निश्चितपणे रुंदावले आहे. स्त्रीवादी विचारधारेमुळे मराठी कविता अधिक विचारसंपन्न आणि आशयसंपन्न झाली आहे. साठोत्तरी कालखंडात आपल्या प्रतिभेचे प्रातिभ तेजाने जे काही पाच-पंचवीस कवी, कवयित्री मराठी काव्यविश्वात तेजाळले आहेत. त्यात अनुराधा पाटील या कवयित्रीचा समावेश होतो. आपल्या पृथगात्म वळणाने अनुराधा पाटील यांनी समकालीन मराठी कविते कवितेतील स्वतःचे वेगळेपण जपले आहे आणि आपल्या काव्यव्यक्तित्वाची विशिष्ट नाममुद्रा मराठी काव्य विश्वात उमटवली आहे.

बीज शब्द :

कविता, स्त्रीत्व, स्त्रीवाद, अभिव्यक्ती, अविष्कार,
आत्मशोध.

प्रस्तावना :

स्त्रीवाद वा स्त्रीमुक्ती ही गतीशील आणि कृतीशील संकल्पना असल्याने स्त्रीवादाची एकच एक व्याख्या करता येत नाही. तरी समाजव्यवस्थेत शतकानुशतके शोषित म्हणून जगणाऱ्या स्त्रीला तिचे शोषण होत आहे याची जाणीव करून देणारा विचार म्हणजे स्त्रीवाद होय असे साधारणता मानले जाते. तसेच स्त्रीला 'स्व'ची ओळख करून देणारे, स्त्रीचे विचार स्वातंत्र्य, निर्णय स्वातंत्र्य आणि आत्मनिर्भरतेची मांडणी करणारे साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य होय. या साहित्यात स्त्रीच्या स्त्रीत्वाचा शोध असतो. डॉ अश्विनी धोंगडे स्त्रीवादी साहित्याविषयी मत मांडताना म्हणतात,"स्त्रीवादी साहित्याची भूमिका जरी प्रत्येक प्रस्थापितांविरुद्ध बंड करण्याची आहे, त्याचप्रमाणे 'शोधका'ची देखील आहे. समाजाने स्त्रीकडून अपेक्षिलेल्या भूमिका पार पडल्यानंतरही स्वतःला समाधान न मिळाल्याचा साक्षात्कार जेव्हा स्त्रीला होतो,



https://drive.google.com/file/d/1J5-muA0baYIC5-y_z4-2TKXecDVbmmGm/view 1/1